| अनुसूचित जातीच्या औद्योगिक सहकारी संस्थेची चेक लिस्ट | | | |
|---|---|---|---|
| **अनु क्र.** | **योजनेच्या अटी/ शर्ती** | **आहे** | **नाही** |
| १ | अनुसूचित जातीच्या नोंदणीकृत सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र ठरतील | | |
| २ | विशेष घटक योजनेच्या तत्वानुसार संस्थेचे भागधारक ७०% अनुसूचित जातीचे असावे. | | |
| ३ | सहकरी संस्थेचे प्रकल्प उभारल्यानंतर व ते व्यवस्थितरित्या सुरु झाल्यानंतर त्यामधील कर्मचारीवर्ग व कामगारवर्गही ७०% अनुसूचित जातीचा असावा. | | |
| ४ | अर्जदार संस्था ह्या अनुसूचित जातीच्या असाव्यात. व त्यांना कर्ज व भागभांडवल विशेष घटक योजनेतून सामाजिक न्याय विभागाकाडून देण्यात येते. | | |
| ५ | अर्जदार सहकारी संस्थांनी शासनास सादर केलेल्या प्रकल्प मुल्याच्या किमान ५% भागभांडवल जमा केल्यानंतर त्यांना शासकीय भाग भांडवल /दीर्घ मुदतीचे कर्ज मिळण्यास पात्र समजण्यात येते. | | |
| ६ | प्रकल्प मूल्य मर्यादा १. अग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन नवी दिल्ली २. दत्ताजी टेक्नीकल इन्स्टिटयूट इचलकरंजी अथवा ३. महाराष्ट्र इलेकट्रिक  महामंडळ मुंबई. (मिटकॉन) अथवा सबंधित वित्तीय संस्था या पैकी कोणत्याही एका संस्थेने निस्चीत केल्याप्रमाणे मात्र कमाल ५ ते ७ कोटी (व्याव्सायानुरूप ) असावी. अर्जदार संस्थांनी यापैकी कोणत्याही यका संस्थेकडून प्रकल्प अहवाल तयार करून घ्यावा. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अर्जदार संस्थेने एकूण प्रकल्प मूल्याच्या ५% एवढ्या निधीची उभारणी स्वतः केल्यानंतर ३५%भाग भांडवल व ३५ दीर्घ मुदतीचे कर्ज विशेष घटक योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येईल. | | |
| ८ | सहकारी संस्थांनी प्रकल्प खर्चाच्या २५% अर्थसहाय्य कर्ज वित्तीय संसाथाकडून प्रथम उपलब्ध करून घ्यावे. त्यानंतर शासनाकडून भाग भांडवल / दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात यावे. | | |
| ९ | सहकारी संस्थांना प्रकल्प उभारतांना संनियंत्रण समिती गठीत करावी व त्यामध्ये एशास्नाचा म्हणजेच समीक न्याय विभागाचा आणि अथवा सहकार व वस्त्रोद्योग विभागाचा वर्ग १ श्रेणीतील एका प्रतिनिधी राहील. | | |
| १० | सहकारी संस्थेचा संचालक मंडळावर शासन नियुक्त करेल असा सामाजिक न्याय विभागाचा एक अधिकारी संचालक म्हणून राहील. | | |
| ११ | सहकारी संस्थेकडे प्रकल्प उभारण्यासाठी प्रकल्प अहवालात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक तेवढी जागा असली पाहिजे. यावर क्त्याही प्रकारचा बोझा नसावा. याबाबत सक्षम अधिका-याने प्रम्नाप्त्र दिले असले पाहिजे, आवश्यक असेल तेथे विगर शेती प्रवण जोडावा. बिगर शेती परवान्याची मुदत संपली असल्यास त्यावर मुदतवाढीचे आदेश समक्ष अधिका-यांकडून घेण्यात यावे. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | सहकारी संस्थांनी शासन मान्य यंत्रसामग्री पुरवठादाराशी यंत्रसामग्री खरेदीबाबत करार करण्यापूर्वी सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडून यंत्रसामग्री पुरवठादार निश्चित करून घ्यावा. | | |
| १३ | प्रकल्प उभारणीकरिता कमाल ५२ आठवड्यांचा कालावधी असावा सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेनुसार निधी मंजूर करण्यात येईल. | | |
| १४ | शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज अथवा भागभांडवल वितरीत केले जाईल त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधीत जिल्हाधिकारीकडून घेण्यात यावे.व त्यानंतर पुढील हप्ता वितरीत करण्यात यावा. | | |
| १५ | कर्जाची परतफेड संस्थेला प्रकल्प मूल्याच्या ९० टक्के निधी अदा केल्यानंतर २ वर्षांनी सुरु करण्यात यावी. कर्ज परतफेडचा कालावधी ६ वर्षाचा असावा. वित्तीय संस्थाच्या कर्जाची वसुली प्रथम ४ वर्षाच्या आत २४ समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी व नंतर व्याजाची वसुली ८ समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात यावी. कर्ज वसुलीची जबाबदारी संचालक समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांची राहील. कर्ज वसुली चा विलंबावधी हा वित्तीय संस्थांप्रमाणे असावा. | | |
| १६ | व्याजाचा दर दंडनीय व्याज इत्यादी वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्यानुसार राष्ट्रीय कृषी व आद्योगिक विकास बँक नवी दिल्ली (नाबार्ड) द्वारा निश्चित केल्याप्रमाणे राहील. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | लाभार्थी संस्थेने संचालक समाज कल्याण व संबंधित सहकारी संस्थांचे अध्यक्ष यांच्या नवे राष्ट्रीयकृत बँकेत संयुक्त खाते उघडावे. व त्यांनी संयुक्तपणे कार्यन्वित करावे. | | |